# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ०७–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. आण्णू गिरमल्ला माळी,<br>मु. पो. रामपूर, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, जत, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

<u>कोरम</u> :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

<u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>

(ग्राहक तक्रार निवारण मंच)

विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री.. आण्णू गिरमल्ला माळी, मु. पो. रामपूर, ता. जत, जि. सांगली यांनी वितरण कंपनीकडे आपली शेती रामपूर गट क्र. १४२ येथे नवीन विद्युत पुरवठा मिळणेसाठी दि. ६.११.२००९ रोजी अर्ज दिला. कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार त्यांस दि. ५.१२.२००९ पर्यंत चलन मिळणे आवश्यक होते व ते चलन १३ दिवस उशिरा दिल्याने सांगली कक्षाने विलंबाबाबत ग्राहकास भरपाई देणेबाबत आदेश दिला आहे. त्यामुळे प्रस्तुतच्या तक्रारीत मंचाकडून चलन देण्यास झालेल्या विलंबाबाबत भरपाई व विद्युत पुरवठा मिळणेस वेळ लागल्याने कृती मानकाप्रमाणे भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. २०.२.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदाराच्या अर्जानुसार त्यांना दि. १८.१२.२००९ रोजी चलन देण्यात आले आहे. तक्रारदाराचे कनेक्शनसाठी ०.२४ कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम करावे लागणार आहे असे म्हटले आहे.

सदरच्या तक्रारीची सुनावणी मंचासमोर दि.९.३.२०१० रोजी घेण्यात आली. तक्रारदाराचे प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित. वि.प.चे श्री. राजमाने, कनिष्ठ अभियंता, जत उप विभाग व श्री. अे.के. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महांकाळ विभाग उपस्थित. १३ दिवसांचा विलंब झाला आहे ही बाब वि.प.स मान्य आहे व अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचे आदेशात असे नमूद केले आहे की, वि.प.ने असे सांगितले आहे की, दि. ८.३.२०१० रोजी कनेक्शन देण्यात आले आहे. आपल्या म्हणण्यापृष्ट्यर्थ तक्रारदाराचा दि. ९.३.२०१० चा अर्ज मंचाकडे दाखल केला आहे, त्यात शेतीपंपास मीटर मिळालेला आहे व तक्रार रद्द करुऩ नुकसान भरपाई नको असे म्हटले आहे. ग्राहक प्रतिनिधींनी त्यास कांही आक्षेप घेतला नाही. अंतर्गत कक्षाने दि. ९.११.२००९ च्या आदेशात विलंबाचा कालावधी व भरपाई किती द्यावी या बाबत स्पष्ट आदेश दिले नाहीत या उलट चलन देण्यास विलंब झाला आहे त्यामुळे भरपाई देण्यात यावी असे निर्देश दिले आहेत. या अस्पष्ट आदेशामुळे तक्रारदारास मंचाकडे धाव घ्यावी लागली. अंतर्गत कक्षाने मुदतीत चलन द्यावे असे आदेश दिले आहेत. या उलट, कक्षाने आदेश देवूनही वि.प.ने तक्रारदारास चलन दिले नाही. त्या आदेशानुसार झालेल्या विलंबाबाबत प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे भरपाई मिळण्याचा तक्रारदारास हक्क आहे, परंतु त्याने तो हक्क दि. ९.३.२०१० च्या अर्जानुसार सोडून दिला आहे. तक्रारदारची दुसरी विनंती की, विद्युत पुरवठा मिळेपर्यंत कृती मानके विनियमातील तरतुदीप्रमाणे नुकसान भरपाई मिळावी. तक्रारदाराचे म्हणण्यानुसार दि. ८.३.२०१० ला त्यास कनेक्शन मिळाले आहे त्यामुळे या काळातील भरपाई मिळण्याचा हक्क सोडून दिला आहे. खालील प्रमाणे आदेश –

ग्राहक तक्रार निवारण मंचाचे अध्यक्षांचे पद दिनांक ३.९.२००९ ते २०.१०.२००९ व सदस्य यांचे पद दि. १.९.२००९ पासून दि. २.११.२००९ पर्यंत रिक्त राहिल्याने मंच कार्यान्वित नसल्याने १०० पेक्षा अधिक प्रकरणांची सुनावणी व निर्णय प्रलंबित राहिल्याने ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००५, क्र. ५:१ चे तरतुदीनुसार सदर अपिलावर असलेल्या दोन महिन्यांचे मुदतीत निर्णय करणे शक्य झाले नाही.

## आदेश

१) तक्रारदाराचा दि. ९.३.२०१० च्या अर्जानुसार तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ५.४.२०१० ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :